MHRG060006972023

दाखल तारीख ०१/०६/२०२३
नोंद तारीख ०१/०६/२०२३
निकाल तारीख ०६/०४/२०२६
कालावधी ०२व, १०म, ०५दि.

**पेण येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या न्यायालयात**
(पीठासीन अधिकारी श्रीमती अनुजा अ. काळे)

**नियमीत फौजदारी खटला क्र. ६६/२०२३** **निशाणी क्र. ५४**
**सीएनआर क्र. एमएचआरजी०६०००६९७२०२३**

महाराष्ट्र शासन,
मार्फत : पोलीस ठाणे पेण,
ता. पेण, जि. रायगड. **...अभियोग पक्ष**

**विरुध्द**

०१. चंदन प्रभाकर भगत,
वयः ३८ वर्षे, कामधंदा – व्यवसाय,
पार्वती निवास म्हाडा कॉलनी प्लॉट नं. २७५
हिमगिरी मार्ग, पेण, ता. पेण, जि. रायगड.

०२. कौसर शमशुल रहेमान शेख,
वयः ३४ वर्षे, कामधंदा– गृहिणी,

०३. फरीन शमशुल रहेमान शेख,
वयः ३६, कामधंदा– गृहिणी,
आरोपी क्र. २ व ३ रा. ००६ बि. विंग श्रीजी
होम डी.के. होम्स समोन कोनगाव कल्याण ठाणे. **...आरोपी**

०४. आशिष गोविंद कदम,
वयः ३९, कामधंदा– व्यवसाय,
रा. योगेश नगर सेक्शन २६, उल्हासनगर, ४,
ठाणे.

---

| | | |
|---|---|---|
| श्री. डी. एस. अवसरमोल | : | सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| श्री. सागर शिंदे, श्री. ए.एल.विश्वकर्मा | : | आरोपींतर्फे विधीज्ञ |

---

## न्यायनिर्णय

(घोषित तारीख : ०६/०४/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ४९८(अ), ४१७,४०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याकरीता चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-**

**०२.** फिर्यादी हिचा आरोपी क्र. १ सोबत विवाह दि.१५.०६.२०२० रोजी झाला व त्यानंतर ती आरोपीच्या घरी नांदण्यास गेली. दि. २३.१०.२०२१ रोजी तिने आरोपी क्र. १ चा मोबाईल ओपन केला असता त्यात तिला आरोपी क्र. ३ चे मॅसेज दिसून आले व त्यावरून आरोपी क्र. १ चे एक मुस्लिम महिलेशी विवाबाह्या संबंध असल्याचे समजले. आरोपी क्र. ३ हिने आरोपी क्र. १ यास हिंदु धर्म बदलून मुस्लीम धर्म स्वीकारणेकरीता ॲफेडेव्हीट कशाप्रकारे करायचे सांगून धर्म बदलणेस सांगितले. आरोपी क्र. ४ हे आरोपी क्र. १ यास घरातून त्याचेसोबत घेउन जाउन आरोपी क्र. १ यास घरचे लोकांना भेटू दिले नाही. सन २०२० पासून आरोपी क्र. १ याने लग्नापूर्वीपासून आरोपी क्र. २ हिचे सोबत असणारे अनैतिक् संबंध लपवून ठेवले. आरोपी क्र. १ हे आरोपी क्र. २ हिचे सोबत विवाहबाह्य संबंध ठेवून फिर्यादीसोबत शरीरसंबंध न ठेवता तीला वैवाहिक जीवनापासून वंचीत ठेवले. रोपी क्र. १ यानी फिर्यादीकडून तिचे बँक ऑफ महाराष्ट्राचे ए.टी.एम. व पिन कोड विश्वासाने घेउन त्याद्वारे खरेदी करत राहून ऑगस्ट २०२० ते एप्रिल २०२१ या कालावधीमध्ये एकूण रक्कम रूपये २,९८,९००/-, गुगलपेद्वारे रक्कम रूपये ५०,०००/- व चेकद्वारे रक्कम रुपये २,००,०००/- असे एकूण रक्कम रूपये ५,४८,९००/- इ. फिर्यादीच्या नावे नवीन व्यवसाय सुरू करण्याचे कारणाने विश्वासाने घेतले व प्रत्यक्षात कोणताही व्यवसाय सुरू न करता सदर रक्कमेचा आरोपी क्र. २ वर खर्च करून अपहार केला. म्हणून फिर्यादीने पोलीस ठाणे पेण येथे आरोपींविरुध्द तक्रार नोंदविली.

**०३.** सदर तक्रारीच्या अनुषगांने गु.र.क्र. ४९/२०२३ अन्वये गुन्हा दाखल

करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलिस उप निरिक्षक एम. जे. घाडगे यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान आरोपींचा शोध घेऊन त्यांना फौज. प्रक्रिया स. कलम ४१(अ) १ प्रमाणे नोटीस देण्यात आली, साक्षीदारांचे जाबजवाब नोंदवण्यात आले आणि तपास पुर्ण झाल्यानंतर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

०४. आरोपीना गुन्ह्याचा तपशील **(नि.क्र. ४३)** वाचून दाखविण्यात आला व समजावून सांगितला. आरोपीनी गुन्हा नाकबुल असल्याचे निवदेन अनुक्रमे **नि.क्र. ४४ ते ४७** सांगून संपरीक्षेची मागणी केली. या न्यायालयाने **नि.क्र. १** खाली दि. १७/०३/२०२६ रोजी आदेश पारित करुन आरोपीच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) निवेदन नोंदविण्याचे वगळले.

०५. अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा तसेच आरोपीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद विचारात घेवुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले, त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे ते येणेप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दि. ०१.०१.२०२० ते दि. १५.०२.२०२३ रोजी पर्यंत पार्वती निवास म्हाडा कॉलनी प्लॉट नं. २७५ हिमागिरी मार्ग पेण येथे आरोपी क्र. १ ते ४ यांनी परस्पर संगनम करून, आरोपी क्र. १ याने आरोपी क्र. २ हिच्या सोबत विवाहबाह्य संबंध ठेवून फिर्यादीला पत्नी प्रमाणे वागणूक न देता तिचा मानसिक व शारीरिक छळ केला व तिचे सोबत शरीरिसंबंध न ठेवता तिला वैवाहिक जीवनापासून वंचित ठेवले व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम **४९८(अ) सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला आहे काय? | नकारार्थी. |
| **२.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद | |

| | | |
|---|---|---|
| | तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी परस्पर संगनमत करून आरोपी क्र. १ यांचे फिर्यादी सोबत लग्नाच्या पुर्वीपासून आरोपी क्र. २ सोबत विवाहबाह्य संबंध ठेवल्याची बाब लपवून फिर्यादीची फसवणूक केली व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम **४१७ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला आहे काय? | नकारार्थी. |
| **३.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी परस्पर संगनमत करून आरोपी क्र. १ यानी फिर्यादीकडून तिचे बँक ऑफ महाराष्ट्राचे ए.टी.एम. व पिन कोड विश्वासाने घेउन त्याद्वारे खरेदी करत राहून ऑगस्ट २०२० ते एप्रिल २०२१ या कालावधीमध्ये एकूण रक्कम रूपये २,९८,९००/–, गुगलपेद्वारे रक्कम रूपये ५०,०००/– व चेकद्वारे रक्कम रुपये २,००,०००/– असे एकूण रक्कम रूपये ५,४८,९००/– इ. फिर्यादीच्या नावे नवीन व्यवसाय सुरू करण्याचे कारणाने विश्वासाने घेतले व प्रत्यक्षात कोणताही व्यवसाय सुरू न करता सदर रक्कमेचा आरोपी क्र. २ वर खर्च करून अपहार केला व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम **४०६ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला आहे काय? | नकारार्थी. |
| **४.** | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**०६.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार फिर्यादी प्रतिक्षा चंदन भगत **(निशाणी क्रमांक ५०)** यांचा पुरावा नोंदविला.

**<u>मुद्दे क्र. १ ते ३ करिता</u>** :–

**०७.** मुद्दे क्र. १ ते ३ हे एक संलग्न असल्याकारणाने घटनेची पुनरावृत्ती

टाळण्याकरीता ते एकत्रितरित्या घेण्यात येत आहेत.

**०८.** फिर्यादी प्रतिक्षा चंदन भगत **(निशाणी क्रमांक ५०)** हिच्या पुराव्यात असे आले की, आरोपी क्र. १ हा तिचा पति असून जून २०२० रोजी त्यांच्या विवाह झाल्याचे सांगितले. घटना केव्हा व कशी घडली हे तिला आठवत नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराला नोंदविण्यात आलेली तक्रार दाखविली असता, त्यातील मजकूराबाबत ती काही सांगू शकत नाही अशी साक्ष नोंदविली आहे. परंतु तिने सदर तक्रारवरील तिची स्वाक्षरी मात्र ओळखली.

**०९.** फिर्यादीने अभियोग पक्षांच्या कथनांना सहकार्य न केल्यामुळे, तिला भारतीय पुरावा कायदयाचे कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्यात आले. तिने फिर्यादमधील अधोरेखांकीत भाग 'अ' मधील मजकूर तक्रारमध्ये का लिहिला याचे कारण ती सांगू शकत नसल्याचे सांगितले. याउलट, तिने तिच्या उलटतपासात आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली असून प्रस्तुत प्रकरणात तिला कोणतेही स्वारस्य नसल्याचे मान्य व कबूल केले आहे. आरोपी क्र. २ व ३ यांचे विरूध्द कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले. तसेच, आता तिला आरोपींविरूध्द प्रस्तुत प्रकरणात इतर कोणतेही साक्षीदार तपासायचे नाहीत असे देखील तिच्या उलटतपासात मान्य व कबूल केले आहे.

**१०.** फिर्यादी हा अभियोग पक्षाचा महत्वाचा साक्षीदार आहे. परंतु फिर्यादीने तिच्या साक्षीदरम्यान, तिच्या फिर्यादमधील कोणताच मजकुर तिच्या पुराव्यात सांगितलेला नाही. फिर्यादीने साक्ष देताना सन २०२० पासून तिचे पती नामे चंदन भगत याचे लग्नापूर्वी पासून महिला नामे कौसर शेख हिचे सोबत अनैतिक संबंध असल्याचे लपवून त्यांची फसवणू केली असल्याचे सांगितले, त्याचे ॲफेडेव्हिट बनवून घेउन सदर महिलेने तिचे पतीस धर्म बदलण्यास लावून सदर महिलेची बहिण नामे फरीन हिने शेख तिचे पतीस कशा प्रकारे प्रतिज्ञापत्र बनवायचे हे सांगितले, सदर महिलेने तिला तिच्या पतीस सोडून देण्यास सांगून तिचे सासू सासरे यांना वृद्धाश्रमामध्ये ठेवण्यास सांगितले, तिचे पती सोबत राहत असताना तिला पत्नीप्रमाणे वागणूक न देता तिचा मानसिक व शारीरिक छळ केले नसल्याचे सांगितले, तिच्या पतीचे मित्र नामे अशिष कदम यांने तिचे पतीस त्यांच्या घरातून बाहेर घेउन जाउन घरी

परत येउ दिल्याचे सांगितले इ. बाबी स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत. त्यामुळे आरोपींनी नेमका कोणता व कशाप्रकारे गुन्हा केला याबाबत संभ्रम निर्माण होतो. साक्षीदरम्यान फिर्यादीने त्याच्यामध्ये व आरोपींमध्ये तडजोड झाल्याचे सांगितल्याने अभियोग पक्ष आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करु शकलेला नाही.

**११.** फिर्यादीच्या साक्षीपुराव्यावरुन असे दिसुन येते की, तिच्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे, करीता तिने साक्षीपुराव्यात काही सांगितलेले नाही. तसेच तक्रारमधील मजकुराबाबत देखील तिला काही माहिती नसल्याचे सांगितले. फिर्यादी ही तिच्या फिर्यादमधील मजकुरच शाबीत करु शकलेली नाही. त्यामुळे उपलब्ध पुरावा आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी पुरेसा नाही. त्यामुळे मी या निष्कर्षास पोहचले की, अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द ठेवलेले आरोप निसंशयपणे सिध्द केलेले नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>** :-

**१२.** वरील निष्कर्ष पाहता आरोपी हे ठेवलेल्या आरोपांतुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे आरोपीनी फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे जामीन देणे गरजेचे आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र. १ ते ४ यांची भारतीय दंड विधान संहिता कलम ४९८(अ),४१७,४०६ सह कलम ३४ च्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक विवो वाय१६ कंपनीचा मोबाईल, एक पांढऱ्या रंगाचा ॲपल आय फोन, एक पाढंऱ्या रंगाचे मोबाईल चार्जर

कॉडकेबल आणि एक पेन ड्राईव्ह कायदेशीर हक्कदारांस अपील कालावधीनंतर परत करण्यात यावा.

४. आरोपींकडून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा जामीन घ्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये आदेशीत व उद्घघोषित.)

ANUJA ANIL KALE
Digitally signed by ANUJA ANIL KALE
Date: 2026.04.06 17:19:33 +0530

(**श्रीमती अ.अ.काळे**)
न्यायदंडधिकारी प्रथमवर्ग, पेण.

पेण
दिनांक – ०६/०४/२०२६